# MY OPINION

ROUGH DRAFT

विषय :-महसूल संवर्गात सुधारणा करणेबाबत कच्चा मसूदा . .

महाराष्ट्र शासनामध्ये महसूल संवर्ग हा लोकसेवा आयोगामध्ये गुणवत्तेमध्ये सर्वसाधारणपणे सर्वात वरच्या स्तरावर असतो. तसेच सदर संवर्ग हा सिव्हील सर्व्हीस वर्गवारीत येत असून पदोन्नतीने भारतीय प्रशासकीय सेवेचा प्रमुख उद्‌गम स्त्रोत आहे.

सदर प्रवर्ग हा महाराष्ट्र सिव्हील सेवेत येत असून क्षेत्रीय स्तरावर काम करत असल्याने नेहमी कोणत्या ना कोणत्या कामात पूर्णपणे व्यस्त असतो. त्यामुळे सदर अधिका-यांना यापूर्वी राज्यस्तरावर एकमेकांशी खुल्यामनाने विचारांची देवाण घेवाण सहजासहजी करता आली नाही.

हया प्रवर्गास यापूर्वी पदोन्नतीच्या चांगल्या संधी असल्यामुळे हा प्रवर्ग आजपर्यंत शातंतेच्या मार्गाने काम करत राहीला परंतू दरम्यानच्या काळात या संवर्गातील हूशारी , कौशल्य व प्रशासकिय गुणवत्ता यामुळे प्रतिनियुक्तीच्या मागणीनूसार व कामाच्या व्याप्तीनूसार भरमसाठ नेमणूका करण्यात आल्या. परंतू, तसे करताना भविष्याच्या व संरचानात्मक उन्नतीच्या दृष्टीने या संवर्गाकडे दुर्लक्ष झाल्याने सदर प्रवर्ग आज कुंठीतावस्थेचे जीवन जगत आहे.

महसूल संघटना ही तसे पाहिले तर आजपर्यंत शासनाला कधीही वेठीस न धरणारी तसेच प्रवर्गांच्या मुलभुत प्रश्नांवर नामधारी राहीली व ते फक्त तात्वीक व तात्कालीक गोष्टीसाठी कधीतरी एकत्र येत राहीले, पुर्वी महसुल संवर्गास पद्योन्नतीच्या चांगल्या संधी/दिवस असल्याने संघटनेमार्फत मुलभूत प्रवर्ग संरचना व त्यांची वेतने व पदोन्नती संधी इ. बार्बीवर म्हणावी अशी चळवळ दिसली नाही. मात्र अलीकडच्या

**कालावधीत संघटनेमार्फत नायब तहसिलदार तहसिलदार / उपजिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी संवर्गाची निश्चिती करणे , नायब तहसिलदार / तहसिलदार वेतननिश्चिती / मॅट व उच्च न्यायालयात प्रवर्गासाठीची प्रकरणे चालवणे इत्यादी बाबीवर उत्कृष्ठ काम करत आहे.**

**आमच्या यापूर्वीच्या 18/19 वर्षाच्या सेवेमध्ये संघटना म्हणून पूणे येथील सन 2013 ची एक बैठक वगळता महसूल अधिकारी कधीही एकत्रित आलेला आम्ही पाहीला नाही. व प्रवर्गाच्या भवितव्यावर सांगोपाग चर्चाही कधी केली नाही.फक्त मंत्रालयीन स्तरावर किंवा विभागीय स्तरावर संघटना -संघटना हा शब्द ऐकण्यात आला व त्यांचेच स्तरावर तात्कालीक व प्रसंगानूरुप सभा होऊन अनुषांगीक कार्यवाही करण्यात आल्या .**

**तसेच महसूल संवर्गातील प्रत्येक जण स्वत:ला सर्वशक्तिमान समजत राहिला.** स्वत:ची हुशारी कामकाज व कष्टाळू प्रवृत्तीमुळे त्याचा मंत्री / खासदार/आमदार/ वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे त्यांचा दबदबा राहीला. **स्वत:च्या वैयक्तिक नियुक्तीसाठी त्याने सर्व ताकद वापरली परंतू संवर्गाच्या सर्वागींन उन्नतीसाठी व प्रगतीसाठी त्याने कधीही** सारासार **विचार केला नाही. सदर** आत्मप्रौढी **धूंदीमुळे संवर्गाच्या** दुरगामी **संरचानात्मक सफल भवितव्याचा मूलभूत विचार** झाल्याचे दिसत **नाही, पर्यायाने,महसूल** संवर्गाचे अपरिमीत नुकसान झाले.

**पूर्वी सरळ सेवेतून उपजिल्हाधिकारी झाल्यावर 8/10 वर्षात भाप्रसे पदोन्नती मिळणारा संवर्ग आज 19 वर्षे सेवेत असूनही त्यास आजपर्यत एकही पदोन्नती** मिळालेली **नाही. इतक्या वर्षात तो साधा अप्पर जिल्हाधिकारी होत नाही** हि प्रशासकीय संरचनमध्ये कालानूसार बदली व सुधारणा न होण्याचा परिणाम आहे.

दरम्यानच्या काळात इतर संवर्ग मात्र जागरुक व संघटीत होऊन आपआपल्या संवर्ग पदोन्नती व भविष्याविषयी सकारात्मक राहीले व इतर ठिकाणी पदस्थापनेच्या संधी शोधू लागले. **पर्यायाने सिव्हील सेवेतील एकमेव विभाग असूनही इतर विभागातील अधिकारी प्रतिनियुक्तीवर जाऊ लागले.**

**एवढेच नव्हेतर उपविभागीय दंडाधिकारी तसेच अप्पर**

**जिल्हाधिकारी या सिव्हील सर्व्हीस पदावरही मत्रांलयातून अधिकारी देण्यात आले. सिव्हील सेवा असल्याने कोणत्याही विभागात जाण्याचा आपला प्रतिनियुक्तीवरील मुलभुत हक्कही मंत्रालयातील महसूल आस्थापना, साप्रवि व इतर विभागांनी डावलण्यास सूरुवात केली. महसूल प्रवर्गाच्या** यापूर्वीच्या **हक्काच्या व प्रति नियुक्तीच्या पदांवर डोळा ठेवून त्यावरही विरोध करण्यास व आक्षेप घेण्या**स **सुरुवात केली.** महसूल **संवर्ग मात्र प्रवर्ग संरचना व भविष्यातील पदोन्नतीतील सुधारणा** याबाबत मूलभूल धोरणे तयार करुन घेण्यात **अपयशी ठरला . तो आपल्याच तंद्रीत मश्गुल राहीला , इतर विभागांनी मात्र मंत्रालयातील अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी समन्वय म्हणा किंवा संगनमत ठेवून आपापले संवर्ग, पदोन्नतीच्या संधी व वेतनवाढी फुगवून घेतल्या.**

**मंत्रालय स्तरावरील महसूल आस्थापनेवर फक्त मंत्रालयातील सर्व व्यक्ती असल्याने ( कधी कधी फक्त उपसचिव महसूल विभागाचा दिला परंतु,**इतर सर्व अधिकारी व कर्मचारीवर्ग मंत्रालयीन आस्थापनाचेच असल्याने काहींनी प्रयत्न केले परंतु म्हणाव्या अशा मुलभुत सुधारणा करु शकले नाहीत) **त्यांनी महसूल प्रशासनाच्या मुलभुत संरचना व उन्नतीकडे धोरणात्मक दृष्टया** काहीच केले नाही. **ते फक्त** महसूल संवर्गाच्या **बदल्यांच्या नस्ती व वैयक्तिक कामाच्या नस्ती हाताळण्यात व्यग्र राहीले. अर्थात त्याला आमचेच अधिकारी कारणीभूत होते हे सांगायला ज्योतिषांची गरज नाही. साधी जेष्ठता यादीही 10/10 वर्षे झाली नाही. पदोन्नतीच्या सभाही वेळेवर झाल्या नाही सामान्या प्रशासन विभागाने भारतीय प्रशासन सेवेत जी प्रस्तावीत यादी** दरवर्षी **अद्यायावत करुन पाठवायची असते तीही तीन -तीन / चार -चार वर्षे पाठवीली नाही. महसूल विभागाच्या नाडया हया मंत्रालयातील** महसुल **आस्थापना** व समान्य प्रशासन विभागाच्या हातात **राहील्याने त्याच्या मंत्रालयातील पदोन्नती, प्रतिनियुक्ती, जेष्ठता यादी इ. अनूषांगीक कामाकडे** दुर्लक्ष **राहीले तर कानाडोळाही करण्यात आला. तेच अधिकारी इतर वि**भागांशी **संगनमत करुन महसुल विभागाच्या**

**सिव्हील सर्व्हीसेसाठी असणा-या जागांवर डोळा ठेवून राहीला. मूलतः महसूल विभागाच्याच असणा-या उपविभागीय दंडाधिकारी** व विभागीय आयुक्त कार्यालयातील उपआयुक्त **सारख्या पदावर इतर संवर्गातील अधिकारी** दिला गेला तरीही **मंत्रालयीन आस्थापना विभागाने त्याकडे जाणूनबूजून दुर्लक्ष** केले. **त्याबाबत क्षेत्रीय स्तरावरील मूळ महसूल विभाग अंधारातच राहीला. इतर विभागही महसूल** संवर्गाकडे **तिरक्या नजरेने पाहू लागले.** एकूणच **महसूल प्रशासनचा कणाच** कमकुवत करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

**आता तर अशी उलटी परिस्थिती आहे की, ती जगाच्या कोणत्याही प्रशासनात आपल्याला पहायला मिळणार नाही. लोकसेवा आयोगातर्फे प्रशासनासाठी लागणारी पदे ही आरक्षणाप्रमाणे व गुणवत्तेप्रमाणे भरण्यात येतात . सर्वोत्तम गुणवत्ताधारक संवर्गाचा उमेदवार भविष्यात सहसा कधीही (आरक्षण** किंवा इतर **विशेष अपवाद** इत्यादी बाबी **वगळता ) सर्वात खालचे 2/3 गुणवत्ताधारक संवर्गाचे खालील दर्जाचा होत नाही किंवा** सहसा **कमी गुणवत्ताधारकाच्या हाताखाली काम करत नाही अशी सर्वसाधारणपणे अलिखीत कार्यपध्दती सर्व प्रशासनामध्ये कार्यरत असते व हा नियम सर्वसाधारणपणे** जगातील प्रशासनात **सर्व ठिकाणी असतो. परंतु महाराष्ट्र शासनामध्ये मात्र आता सर्वात वरिष्ठ गुणवत्ताधारक प्रवर्ग काही ठिकाणी सर्वात खालील 2/3 गुणवत्ताधारक प्रवर्गाच्या समान दर्जाचे किंवा खालच्या दर्जाचे पदावर किंवा कमी वेतनावर काम करताना दिसत आहे.**

**उदा . 1996 च्या बॅचमध्ये सर्वात वरिष्ठ गुणवत्ताधारक प्रवर्ग उपजिल्हाधिकारी हा आज 19 व्या वर्षी उपजिल्हाधिकारी या जागेवरच काम करत आहे त्यांचे बरोबरच्या काही अव्वल कारकूनही आज त्यांचे बरोबरच उपजिल्हाधिकारी म्हणून काम करतात तर त्याचे बरोबरचे सेल्स टॅक्स ऑफीसर , उपायुक्त होऊन 7/8 वर्षे झालेली आहे. त्यांचे बरोबरचे DYSP आता भारतीय पोलीस सेवेसाठी नामनिर्देशित झालेले आहेत. त्यांचे बरोबरचे** सहायक **निबंधक**

**हे जिल्हा उपनिबंधक झालेले आहे. TILR आता SLR झालेले आहेत.** त्यांचे बरोबरचे लेखाधिकारी आता उप संचालक म्हणून काम करीत आहेत. त्यांचे **बॅचचे कक्ष अधिकारी आज मत्रांलयात उपसचिव म्हणून महाराष्ट्राचे काम पहात आहे . .. ... ..** याला कारण सामान्य प्रशासन विभास व मंत्रालयीन आस्थापना विभाग यांची महसूल संवर्गाची धोरणे ठरविण्यात असलेली अनास्था व अपयश जितके कारणीभूत आहे. तितकीच महसूल संवर्गाची आपल्या भविष्या बाबत दुरगामी विचार न करण्याची स्वंयकेंद्रित मनोवृत्ती कारणीभूत आहे.

**अर्थात हे उदाहरणार्थ दिले असून त्यामध्ये एखादया प्रवर्गाचे भविष्य** चांगले **झाले असेल तर ते चांगलेच आहे त्याबद्यल द्वेष/राग/**हेवा **नसून हया संधी सर्वोत्कृष्ट गुणवत्ताधारक महसूल विभागास देताना** कुटील डाव खेळून **भेदनितीचा अवलंब का केला जातो हया दुटप्पी भुमिकेला व** महसूल संवर्गाचे भवितव्याविषयाची धोरणे ठरविण्यास अपयशी ठरलेल्या **प्रशासन व्यवस्थेला दोष दयाचचा आहे.** या सर्व बाबी न होण्यामागे महसूल संवर्ग गाफील राहिला . परंतू, मंत्रालयातील महसूल प्रशासन व सामान्य प्रशासन विभागही त्याबद्दल सर्वसमावेशक मुलभुत धोरणे व संवर्ग संरचना आखण्यास अपयशी राहीला.

**विशेष म्हणजे** मध्यतंरी सन २०१३-१४ साली मा. मुख्य सचिवांच्या आदेशानुसार ईतर विभागाच्या सचिवांनी साधारंता **70/80** अपर जिल्हाधिकारी **पदांची** लेखी **मागणी महसूल आस्थापना प्रशासनाकडे आली** त्यावर **यांनी** काय केले हे देवालाच माहित? **त्याबाबत** ते **गप्प आहेत. विचारणा केली की म्हणतात की त्याचे RR कुठे आहेत.** परंतु, मा. मुख्य सचिवांच्या पत्रामध्येच पदांच्या मागणी प्रमाणे सहा महिन्यात **RR** करावेत असा स्वयंस्पष्ठ उल्लेख होता असे आठवते. त्यामुळे सदर मागणी ही आता कायम धरून त्याप्रमाणे काय करता येईल हे पाहणे गरजेचे आहे शिवाय महसुल आस्थापनाच्या म्हणण्यानुसार सदर विभागाने **RR** केले नाहीत **मग** सदर **RR काय क्षेत्रीय स्तरावर काम करुन** महसूल संवर्गाने **करायचे काय ? बंर मागणी आल्यावर मंत्रालयीन आस्थापना स्तरावर किती पाठपूरावा,** सभा **व पत्र व्यवहार करुन RR अंतिम करण्याबाबत यांनी संबधीत मागणी करणा-या विभागाकडे**

**पाठपूरावा केला -----------उत्तर ---शुन्य** आहे**.**

**विशेष म्हणजे यांनीच तहसिलदार ते उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी ते निवड श्रेणी उपजिल्हाधिकारी पदोन्नती जेष्ठता यादी** केली **नाही, IAS मध्ये पदोन्नतीचा प्रस्ताव पाठविला नाही, निवडश्रेणी अप्पर जिल्हाधिकारी यांची रिक्त पदे असूनही पदोन्नती** केली **नाही,** त्यासाठी गोपणीय अहवाल नाही, जात वैधताचे प्रमाणपत्र नाही, विभागी चौकशीची माहिती नाही, **इत्यादी कारणे देऊन नामजूंर केली. मग यांनी वेळोवेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वाढत्या** मागणी व **कामानूसार दरवर्षी पदाची मागणी करुन पदे भरली. गेले 54 वर्ष** कोणत्याही नविन जबाबदारीवर गरज पडेल तेथे महसुल संवर्गाने प्रशासनाची जबाबदारी पूर्ण केली. परंतु, **सदर प्रवर्गाच्या पदोन्नती संधी व भवितव्य व मूलभूत संरचनेकडे लक्ष दयायला वेळ मिळाला नाही का ? या सर्व बाबी म्हणजे जाणून बुजून महसूल प्रवर्गाचा** खच्चीकरण **करण्याचा कुटील डाव असण्याची शक्यता वाटत असून त्यामागे कुणीतरी अनूचीत हेतूने काम करत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**अशी परिस्थिती राहीली तर सरळ सेवा उपजिल्हाधिकारी** हा **जास्तीत जास्त निवडश्रेणी या पदावरच रिटार्यड होईल** तर नायब तहसिलदार व तहसिलदार हे सुध्दा त्याच पदावर किंवा जास्तीत जास्त उपजिल्हाधिकारी पदापर्यंत पोहोचेल **अशा प्रकारची वस्तुस्थिती निर्माण झाली आहे. एकुणच सर्व वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता हीच जर परिस्थिती राहीली व त्याकडे अधिक दुर्लक्ष झाले तर परिस्थिती सुधारण्याचे पलीकडे जाईल. यांची सर्वानी नोद घ्यावी.**

## नवीन कार्यपध्दती (New Modus Operandi)

**मंत्रालय स्तरावरुन महसूल संवर्गाचे प्रतिनियुक्तीवरील वर्चस्व संपुष्टांत आणण्यासाठी त्यांच्या पदोन्नतीसाठीच्या DPC वेळेवर न घेणे, ज्येष्ठता यादया तयार न करणे, गोपनिय अहवाल व विभागीय चौकशी अहवाल प्राप्त नाही, असे सांगणे, इ.प्रकारच्या अडचणी तयार करण्यात**

आलेल्या आहेत.एवढेच नव्हे तर आता काही विभागात /जिल्हयात महसूल विभागाची खुपच पदे रिक्त आहेत. हे **कोणत्यातरी मंत्र्याच्या किंवा सचिवाच्या तोडूंन वदवायचे** व लागलीच महसूल संवर्गातील प्रतिनियुक्तीच्या अधिका-यांचे आदेश काढून त्यांना मूळ विभागात पाठवायचे व त्यानंतर मंत्रालयीन/विकास/इतर विभागातील अधिकारी यांची नियुक्ती महसूल संवर्गातील बदली केलेल्या अधिका-याच्या जागेवर करायची हा नवीन पांयडा सुरु झालेला आहे.

**IN fact in certain region there are vacancies in every department. Then why cry / shouts only towards revenue officers.** शासनाला रिक्त पदेच जर भरायची असतील तर त्यांनी ज्या ठिकाणी रिक्त जागा आहेत त्या ठिकाणी ज्यांचे आदेश काढले त्यांना सक्तीने रुजू करायला भाग पाडायला हवे.तसेच, काही अधिका-यांना महिनो-महिना पदस्थापना देत नाही, अशावेळी शासनाला रिक्त जागा दिसत नाही का? बरं, अधिका-यांनी एकदा तरी विदर्भ, मराठवाडा, तळकोकण येथे कमीत कमी 3 वर्षाची सेवा केलीच पाहिजे, असा व्यवहार्य GR काढला व खरोखरच राबवला तर शासनाला कोण वाईट म्हणेल?, पंरतू, तसे न करता एका ठिकाणचे अधिका-यांचे आदेश शासनानेच काढायचे, तो रुजू झाला नाही तरी त्यांनीच पून्हा त्याच अधिका-यास इतर ठिकाणी बदली दाखवायचे हा प्रकार संयुक्तिक नाही.

आता तर आणखी एक नवीन कार्यपध्दती मंत्रालयात जाणूनबुजून आलेली आहे, ती म्हणजे पूर्वी प्रतिनियुक्तीची मागणी आल्यास सर्वप्रथम महसूल संवर्गात विभागवार माहिती अवगत करण्यात येत होती. आता तसे न करता सदर मागणी महसूल संवर्गास अवगत न करता मंत्रालय स्तरावरुन मंत्रालय किंवा इतर संवर्गास प्रतिनियुक्ती देऊन मामला रफादफा करण्यात येतो.

**त्यामुळे महसूल प्रवर्गाचा एक** घटक **म्हणुन** मला सुचलेल्या **काही प्राथमिक उपाययोजना मसूदा स्वरुपात सूचवत असून त्याचा दुरगामी परिणाम निश्चितच कल्याणकारी**

**होण्यासाठी आपण त्यात** आवश्यक ते बदल/उपाययोजना करून सदर मसूद्यास अंतिम स्वरुप देऊन थोडक्यात दोन तिन पृष्ठामध्ये शासनास देणे उचित ठरेल ...........

**1 महसूल प्रशासनातील नायब तहसिलदार, तहसिलदार , उपजिल्हाधिकारी , अप्पर जिल्हाधिकारी , यांचे RR अद्यायावत तयार करणे.**

**2 सदर RR करतांना सरळसेवा व पदोन्नती यांचा** कोटा **इतर विभागाप्रमाणे अंतिम करणे .**

**3 महसुल अधिकारी हे सिव्हील सेवा असलेला एकमेव प्रवर्ग असल्याचे शासना मार्फत घोषीत करुन घेणे.**

**4 सिव्हील सर्व्हीसमधील अधिका-यांचा प्रतिनियुक्ती हक्क कायम** करणे.

5 प्रतिनियुक्तीवरील अधिकारी हि शासनाची गरज असल्याने ते संवर्गाचाच भाग असल्याचे गृहित धरणे.

**6-सर्व** महसूल **प्रवर्गातील पदांची** संवर्ग **संख्या / पदसंख्या अंतिम करणे.**

**7.प्रतिनियुक्तीची पदे ही कधी असतात कधी नसतात त्यामुळे ती संख्या प्रवर्गाच्या संख्येमध्ये न धरता स्वतंत्र धरणे. प्रतिनियुक्तीची पदे ही काही आस्थांपनाना तात्पुरती लागतात त्यामुळे सदर आस्थांपनांकडून RR ची अपेक्षा न धरता महसूल विभागानेच त्यांचे प्रतिनियुक्ती RR तयार करणे व प्रती नियुक्ती पदे मागतील त्यावेळी नियुक्ती आदेशाबरोबरच त्यांना तो RR पाठवणे. प्रवर्गातील पदांची संख्या पुर्णपणे भरलेली आहे व त्यानंतर कोणी पदोन्नती मागीतल्यास सदर पदोन्नतीचे एक जरी पद खाली असले तरी ते अतितात्काळ भरण्यात यावे. प्रतिनियुक्तीच्या पदावर लोकसेवा आयोगातील** सर्वसाधारणपणे **सर्वोच्य गुणवत्ताधारक असलेले सिव्हील सर्व्हीस अधिकारी हेच फक्त पात्र राहतील हे शासनास बिबंवावे.**

**8.** प्रतिनियुक्ती व विभागवार नेमणूकीबाबत / बदलीबाबत पारदर्शकता व समान न्याय मिळणेसाठी शासनाने उपलब्ध पदे / विभागवार उपलब्ध अधिकारी इत्यादी बांबीचा ताळमेळ घेऊन दिर्घकालीन धोरण / नियम तयार

करावेत.

**9-पदांची संख्या संपल्यावरही मागणी झाल्यास त्यावर प्रतिनियुक्ती देण्यासाठी पदसंख्येचा आकडा गृहीत न धरता मागणीनूसार अधिकारी देणे.**

**10-तहसिलदार व उपजिल्हाधिकरी व अप्पर जिल्हाधिकारी हया संवर्गातील कूंठीतता दूर करण्यासाठी त्यामध्ये** प्रतिनियुक्तिचा हक्क कायम ठेवून संवर्गाअंतर्गत **खालीलप्रमाणे** नविन **पदनामे (**यापुढील चर्चा त्याच पदनामाने केली आहे **व वेतनमान ठरविण्यात यावे .**

| अ.क्र | संवर्ग | पद | पदोन्नतीसाठी पात्रता | सद्याचा वेतनपट्टा | प्रस्तावित वेतनपट्टा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **नायब तहसिलदार** | **नायब तहसिलदार** | सरळसेवा किंवा पद्दोन्नतीने | 9300-34800GP 4300 | 9300-34800 GP 4600 |
| | | **वरिष्ठ नायब तहसिलदार** | **नायब तहसिलदार पदावर** कमाल **४ वर्ष सेवा** | | 9300-34800 GP 4800 |
| 2 | **तहसिलदार** | **तहसिलदार** | सरळसेवा किंवा पद्दोन्नतीने | 15600-39100 GP 5000 | 15600-39100 GP 5200 |
| | | **वरिष्ठ तहसिलदार** | **तहसिलदार पदावर** कमाल **८ वर्ष सेवा** | | 15600-39100 GP |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 5300 |
| **3** | **उपजिल्हाधिकारी** | **उपजिल्हाधिकारी** | सरळसेवा किंवा पद्दोन्नतीने | 15600-39100 GP 5400 | 15600-39100 GP 5400 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **निवडश्रेणी वरिष्ठ उपजिल्हाधिकारी** हे पदनाम बदलून वरिष्ठ उपजिल्हाधिकारी हे नाव करण्यात यावे. | **उपजिल्हाधिकारी पदावर** कमाल **8 वर्ष सेवा** | 15600-39100 GP 6600 | 15600-39100 GP 6800 |
| **4** | **अप्पर जिल्हाधिकारी** | **अप्पर जिल्हाधिकारी** | **उपजिल्हाधिकारी पदावर** कमाल **12 वर्ष सेवा** | 15600-39100 GP 7600 | 15600-39100 GP 7800 |
| | | **सह जिल्हाधिकारी Joint Collector**(येथे निवडश्रेणी हे पदनाम बदलून सहजिल्हाधिकारी करण्यात यावे) | **उपजिल्हाधिकारी संवर्गात** कमाल **12 वर्ष सेवा किंवा अप्पर जिल्हाधिकारी संवर्गात** कमाल **4 वर्ष सेवा.** | 37400-67000 GP 8700 | 37400-67000 GP 8900 |
| | | **भाप्रसे दर्जा जिल्हाधिकारी** | **उपजिल्हाधिकारी संवर्गात** कमाल **12 वर्ष सेवा किंवा अप्पर /**सह **जिल्हाधिकारी संवर्गात** कमाल **8 वर्ष सेवा.** | 37400-67000 GP 10000 | **भाप्रसे धर्तीवर वेतन पध्दती** व वेतनवाढी राहतील. |

टिप:- अ) परंतू, असे की, जर उपलब्ध पदे हि कमी पडत असतील किंवा पदोन्नतीचा संधी आल्यास अशावेळी उपरोक्त नमुद सेवेचा कमाल कालावधी हा कमाल असल्याने त्याचा विचार न करता सदर अधिका-यास तात्काळ वरील पदावर पदोन्नती देऊन रिक्त पदे भरण्यात यावीत.

ब) **उपरोक्त** संवर्गात पदोन्नती करताना वरिष्ठ नायब तहसिलदार ते तहसिलदार, वरिष्ठ **तहसिलदार ते उपजिल्हाधिकारी,** वरिष्ठ **उपजिल्हाधिकारी ते अप्पर जिल्हाधिकारी व** सह **जिल्हाधिकारी ते** भा.प्र.से. दर्जा **जिल्हाधिकारी या पदावरच फक्त बिंदु**नामावली व DPC ची प्रक्रिया पार पाडावी इतरवेळी संवर्ग व पदांच्या कार्यपध्दतीत मोठा बदल होत नसल्याने फक्त सेवेची वर्षे लक्षात **घेऊन वरिष्ठ पदाचे पदनाम व वेतन श्रेणी याबाबत पदोन्नतीचे आदेश** दर सहा महिन्यांनी ( १ जाने.व १ जुलै रोजी) **नियमितपणे पारीत करण्यात यावेत .**

क) वरील पदनामे व वेतनमान प्रस्तावास सक्षम व गुणवत्ता असलेले मुद्दे शासनास सोदाहरण द्यावे लागतील. उद्दा. पदनामे ..... विक्रिकर अधिकारी यांचे पदनाम सहाय्यक विक्रीकर आयुक्त असे करून घेतले तसेच, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांचे नाव उप अधिक्षक भूमि अभिलेख असे करून घेतले.

**11 हया प्रस्तावित संवर्गातील 10 पदांसाठी मंत्रालय आस्थापनेवर मूळ महसूल विभागात क्षेत्रीय स्तरावर काम केलेला एक** सह **जिल्हाधिकारी (मंत्रालयीन दर्जा सहसचिव), तीन अप्पर जिल्हाधिकारी (मंत्रालयीन दर्जा उपसचिव) ,3 उपजिल्हाधिकारी (दर्जा-अव्वर सचिव ), 3 तहसिलदार व 6 नायब तहसिलदार , 6 लिपिक व 6 शिपाई** इतका अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमावा.

**सह-जिल्हाधिकारी -1**

अपर जिल्हाधिकारी -१ अपर जिल्हाधिकारी -१ अपर जिल्हाधिकारी -१

(ना.त.आस्थापना व पुणे , नागपूर जमीन ) (तह आस्थापना व कोकण , अमरावती जमीन) (उ.जि./अ.जि.आस्था व नाशिक, औरंगाबाद विभाग जमीन )

उपजिल्हाधिकारी -१ उपजिल्हाधिकारी-१ उपजिल्हाधिकारी-१

| | | |
|---|---|---|
| तहसिलदार **-1** | तहसिलदार-१ | तहसिलदार-१ |
| नायब तहसिलदार **-2** | नायब तहसिलदार-२ | नायब तहसिलदार **-2** |
| लिपिक -२ | लिपिक -२ | लिपिक-२ |
| शिपाई-२ | शिपाई-२ | शिपाई-२ |

**12** उपरोक्त नमूद सह **जिल्हाधिकारी , अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी,**तहसिलदार व नायब तहसिलदार **हे** मुळ विभागात क्षेत्रिय स्तरावरील अधिकारीच असतील व ते महसूल संवर्ग आस्थापना व विभागीय स्तरावरील जमीनबाबत नस्तींचे कामकाज पहातील.

**13 सर्व अधिका-यांचे RR हे एकाचे वेळी बनविण्यात येतील व त्यामध्येच सर्व प्रतिनियुक्ती पदाबाबतचा उल्लेख करण्यात येईल व** काही संस्थांना महसूल संवर्गातील अधिकारी हे फक्त एकाच प्रकल्पासाठी थोडया कालावधीसाठी लागत असतात.अशावेळी अशा पदांबाबतचे RR महसूल विभागच तयार करेल व **प्रतिनियुक्ती मागणा-या संस्थेस आदेशासोबत** सदर **RR** देण्यात **येतील.**

**14.** नायब तहसिलदार ते सह जिल्हाधिकारी न्यायिक / अर्ध हे न्यायिक कामे पार पाडीत असल्याने त्यांना judges protection कायदा लागू करावा.

15.महसूल संवर्गातील बदल्याबाबत निश्चित अशी नियमावली नसल्याने मा. सुप्रिम न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे बदल्याबाबंत आस्थापना मंडळ निर्माण करण्यात येऊन बदल्याबाबत पारदर्शकता आणावी.

16. तसेच, बदल्याबाबंत संगणकीय प्रणाली तयार करुन बदल्याबाबंतची तसेच प्रत्येक कर्मचारी महसूल संवर्गात रुजू झाल्यापासूनची सर्व माहिति महसूल विभागाच्या संकेतस्थळावर online ठेवण्यात यावी.

17. दरवर्षी सर्व महसूल संवर्गाची ज्येष्ठता सूची १ जानेवारी रोजी प्रसिध्द करावी.

18. महसूल संवर्गाची पदोन्नती DPC वर्षातून दोन वेळा कमीत कमी ३ महिन्यांचे अंतराने घेण्यात यावी.

19.महसूल संवर्गाचे Cadre Fixation वेळोवेळी करण्यात यावे. तसे झाले नाही तर गेल्या ५ वर्षात महसूल संवर्गात ज्या दिनांकाला सर्वात जास्त महसूल अधिकारी (प्रतिनियुक्ती वरिल अधिकारी धरुन) काम करत होते. सदर

आकडेवारी हि संवर्ग आकडेवारी समजण्यात यावी. परंतू, असे की एखादया संवर्गात अचानक नवीन पद निश्चिती करुन वाढ करावयाची झाल्यास गेल्या ५ वर्षाची सर्वात मोठी आकडेवारी + नवीन निर्माण करावयाची पदे हि संवर्गाची आकडेवारी समजण्यात यावी.

20. कोणतेही सबळ कारण नसेल तर महसूल संवर्गातील कोणत्याही अधिका-यास ४ महिन्यापेक्षा जास्त वेळ विना पदाचे रिकामे ठेवता कामा नये.

21. जाती व उत्पन्न दाखल्याकरीता स्वतंत्र आस्थापना महसूल विभागाच्या अखत्यारीत निर्माण करण्यात यावी.

22.मंत्रालयात नायब तहसिलदार ते अप्पर जिल्हाधिकारी यांना पत्र दाखवताच प्रवेश देण्यात यावा.

23.प्रतिनियुक्ती अधिका-यांना प्रतिनियुक्त संस्थेने कमीत कमी तिन महिन्याची नोटीस देऊनच कार्यमुक्त करावे. कोणत्याही परिस्थितीत मनमानी पध्दतीने प्रतिनियुक्ती संस्थेने प्रतिनियुक्तीवरील अधिका-यास एकतर्फी शासनाकडे पाठवू नये.

24. महाराष्ट/कंद्र शासनातील तसेच, ईतर बाहेरील पदावर गेल्या दहा वर्षात महसुल संवर्गाने काम केलेली प्रतिनियुक्ति वरील सर्व पदांची माहिती घेण्यात यावी व त्याचा ताळमेळ आजच्या स्थितीची घेण्यात येऊन ती सर्व पदे शासनातील सर्वसाधारणपणे सर्वोच्च गुणवत्ताधारक असलेल्या महसुल संवर्गास देण्याबाबत शासनास भाग पाडणे.

25.मंत्रालयात सभेसाठी आल्यावर राहण्याची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी.

26. प्रत्येक जिल्हयात एक उपजिल्हाधिकारी वा इतर अधिका-यांची एक आस्थापना हि जिल्हा शिष्टाचार विभाग म्हणून ठेवावी.

27.प्रत्येक विभागात महसूल संवर्गाची तक्रार निवारणसभा हि प्रत्येक महिन्यात मा.आयुक्तांच्या अध्यक्षेतेखाली घेऊन त्याचे इतिवृत्त प्रत्येक जिल्हयात देण्यात यावे. व त्याची प्रत प्रत्येक संघटनेस देण्यात यावी.

28. महसूल स्तरावरील नियुक्तीच्या सर्व पदांचे धोरण/नियम/आचार संहिता ईत्यादी तयार करणे/इतर विभागांकडून माहिती घेणे ईत्यादी महत्वाचे मुद्दाबांबत **{ (i.** महसुल विभागाच्या मुळ पदांचे व प्रतिनियुक्तिच्या पदांचे RR करून घेणे. ii. बदल्यांबाबत (प्रतिनियुक्ति वरील पदांसह) पारदर्शक धोरण आखून महाराष्ट्रातील सर्व विभागात/जिल्ह्यात पुरेसे अधिकारी राहतील याबाबत दक्षता घेणे. iii. सर्व महसुल संवर्गाची (नायब तहसिलदार ते सह जिल्हाधिकारी) पदांची निश्चिती करणे. iv. प्रत्ये्क संवर्गातील नविन अधिकारी व वरिष्ठ अधिकारी याबाबत पदांचा ताळमेळ घेऊन वरिष्ठ

अधिका-यांना ठराविक पदे चिन्हांकित करणे. v. महसूल संवर्गातील पदोन्नती व न्याय वेतन श्रेणी याबाबत धोरण निश्चिती करणे. vi. महसुल संवर्गावर असलेला कामाचा व्याप व उपलब्ध पाठबळ (कर्मचारी/यंत्रणा/सोयी सुविधा/खर्चाकरीता आर्थिक तरतूदी इत्यादी) याचा अभ्यास करणे व त्याप्रमाणे शासनास उपाय योजना सूचवणे vii. जातीचे/उत्पनाचे दाखल्यांमध्ये अधिका-यांचा खुप वेळ खर्च होत असल्याने सदर ठिकाणी पर्यायी व्यवस्था निर्माण करता येईल किंवा कसे? व सदर अधिका-यांना त्यांच्या मूलभूत कामाकरीता प्रस्तावित करणे. viii. महसूल संवर्गाचे कल्याणाबाबत धोरण निश्चिती . ix) उपरोक्त सर्व मुद्यांबाबत सबळ, सक्षम व on merit प्रस्तावासाठी वस्तुस्थिती व आकडेवारी (Facts & Figures)} गोळा करणे इत्यादी. ) धोरण आखण्यासाठी कमीत कमी ५ सदस्यांची ३/६ महिने पूर्ण कालावधीची महसुल विभागात काम केलेल्या तज्ञांची समिती गठण करणे.

29. राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर महसूल संघटनेची स्थापना व नोंदणी करणे. प्रत्येक सभासदाकडून वार्षिक नायब तहसिलदार १,०००रु., तहसिलदार- १,५००रु, उपजिल्हाधिकारी- २,०००रु. व अपर /सह जिल्हाधिकारी- ३,०००रु.याप्रमाणे जिल्हास्तरावर वर्गणी जमा करणे.

30. मुंबईतील वांद्रे परिसरात ज्याप्रमाणे महसुल संघटनेस भूखंड आरक्षीत केलेला आहे त्याप्रमाणे, प्रत्येक जिल्ह्यात व विभागीय स्तरावर संघटने मार्फत भूखंडाची मागणी करून ते प्राप्त करून घेणे व सदर भूखंडावर महसूल भवन बांधून तेथे निवास/प्रशिक्षण/शिबिरे/महसूल संवर्गाचे सार्वजनिक कार्यक्रम इत्यादी महसुल संवर्ग कल्याणाचे कार्यक्रम राबवणे.

## संवर्गासाठी नियम :

**आज महाराष्ट्रात approximately 1300 नायब तहसिलदार , 700 तहसिलदार , 600 उपजिल्हाधिकारी and 200 अप्पर जिल्हाधिकारी इतकी पदे** मंजूर **आहेत त्यामुळे भविष्यात सर्व प्रवर्गात योग्य व समान संधी मिळाव्यात** तसेच बदल्यांमध्ये व प्रतिनियुक्ति नेमणूकीमध्ये पारदर्शक्ता यावी **म्हणून** नायबतहसिलदार, तहसिलदार, **उपजिल्हाधिकारी व**

## अप्पर जिल्हाधिकारी संवर्गात ***<u>मला सूचल्याप्रमाणे</u>*** खालील उपाय सुचवत आहे

## नायब तहसिलदार

१. नायब तहसिलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती हि IAS धर्तीवर करण्यात यावी.

२. संपूर्ण संवर्ग हा विभागीय स्तरावर कार्यरत असला तरी राजपत्रित व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड होत असल्याने तो राज्यस्तरीय करुन त्याप्रमाणे संपूर्ण राज्याची दरवर्षी एकच ज्येष्ठता सूची जाहीर करावी.

३. सदर पदाची आजची वेतनश्रेणी ९,३००-३४,८०० (ग्रेड पे-४,३००)असून ती अन्यायकारक असल्याने ती इतकी ९,३००-३४,८०० (ग्रेड पे-४,६००) करावी.

४. नायब तहसिलदार ते तहसिलदार संवर्गात पदोन्नती देताना सरळसेवा व बढती यातील कोटा निश्चित करावा.

५. मंत्रालयात नायब तहसिलदार संवर्गाबाबत स्वतंत्र आस्थापना ठेवावी की, जी सर्व विभागीय आस्थापनांशी ताळमेळ ठेवेल.

६. नायब तहसिलदार यांची बदली विभागीय स्तरावर मा. विभागीय आयुक्त यांनी करावी.

७. जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हयात नायब तहसिलदारांचे बदली करण्याचे अधिकार राहतील.

८. नायब तहसिलदार पदांचे नव्याने RR तयार करण्यात यावे.

९. निवासी नायब तहसिलदार हे जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयातील सर्व नायब तहसिलदार पदे ही वरिष्ठ नायब तहसिलदार या पदाकरीता राखीव असावे. अशाच प्रकारे नायब तहसीलदार संवर्गात नायब तहसीलदार व वरिष्ठ नायब तहसीलदार या पदांचा प्रतिनियुक्ति वरील पदांसह ताळमेळ घेऊन ठरावीक पदे वरिष्ठ नायब तहसीलदार करीता चिन्हांकित करण्यात यावी.

१०. वरिष्ठ नायब तहसिलदार हे प्रतिनियुक्ती पदावर जाण्यास पात्र राहतील.

११. परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर पहिल्या ६ वर्षात कोणत्याही परिसरात कमीत कमी २ वर्षाची एक पदस्थापना विदर्भ / मराठवाडा येथे झालीच पाहिजे.

## तहसिलदार

१ तहसिलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती हि IAS धर्तीवर करण्यात यावी.

२. सदर प्रवर्गात वेतनश्रेणी त ग्रेड पे ५,०००/- आहे तो ५,२००/-करण्यात यावा.

३ तहसिलदार हा तालुकाप्रमुख म्हणून घोषित करावा

४ तहसिलदार यांची ज्येष्ठता सुची दरवर्षी जाहीर करण्यात यावी.

५ जिल्हयातील काही तालुके हे मोठे तालुके म्हणून जाहीर करुन त्या ठिकाणी वरीष्ठ तहसिलदार यांना पदस्थापना दयावी. तसेच,जिल्हाधिकारी कार्यालयातील चिटणीस, आयुक्त कार्यालयातील तहसिलदारांचे पदेही वरिष्ठ तहसिलदार पदांसाठी राखीव ठेवावी. अशाच प्रकारे तहसीलदार संवर्गात तहसीलदार व वरिष्ठ तहसीलदार या पदांचा प्रतिनियुक्ति वरील पदांसह ताळमेळ घेऊन ठरावीक पदे वरिष्ठ तहसीलदार करीता चिन्हांकित करण्यात यावी.

६ पदोन्नती देताना सरळसेवा व पदोन्नतीतील तहसिलदार यांचा कोटा निश्चित करावा.

७.तहसिलदार पदांचे नव्याने RR तयार करण्यात यावे.

८...वरिष्ठ तहसिलदार हे प्रतिनियुक्तीच्या पदावर काम करण्यास पात्र राहतील.

९.. परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर प्रथम ६ वर्षात कोणत्याही परिस्थितीत, विदर्भ / मराठवाडात एक कमीत कमी २ वर्षाची पदस्थापना हि केलीच पाहिजे.

## उपजिल्हाधिकारी

1. उपजिल्हाधिकारी संवर्गातील प्रथम नियुक्ती हि IAS धर्तीवर करण्यात यावी.

**2.**उपविभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यास उपविभागाचा प्रमुख म्हणून घोषित करण्यात यावे.

३.**परिविक्षाधिन कालावधी संपल्यानंतर प्रथम नियुक्ती ही** उपविभागीय अधिकारी **अशी**च **झाली पाहीजे** व त्यानंतर दुसरी पदस्थापना विशेष भुसंपादन अधिकारी पदावर देण्यात यावी.**उ.वि.अ. नंतर त्याची** बदली **वि.भु.अ. म्हणूनच झाली पाहीजे अशावेळी त्याचे सेवेशी 3 वर्ष पूर्ण झाली व सर्वसाधारण बदलीवेळी विभुअ पद रिक्त** न**सेल तर त्याची पदस्थापना सर्वसाधारण बदली वेळी तेथेच व्हावी.**समजा परिक्षावधीन उपजिल्हाधिकारी पदानंतर उ.वि.अ.पद

रिकामे नसेल अशावेळी त्याला तात्पुरती  पदस्थापना इतर ठिकाणीउ दयावी. पंरतू,असे कोणत्याही कारणास्तव विभागात एकजरी उ.वि.अ. पद रिक्त झाल्यास किंवा एखादयास ३ वर्ष पूर्ण झाल्यास त्या पदावर परिक्षावधीन उपजिल्हाधिकारी पदावरुन वि.भू.अ.यास उ.वि.अ. पदावर सर्वप्रथम देण्यात यावे.

4. **परिविक्षाधिन कालावधी संपल्यावर पहिल्या 6 वर्षात कोणत्याही परिस्थितीत विदर्भ व मराठवाडा विभागात ढर्ईद्दह  वर्षाचा ˆईय्हह कालावधी हा झालाच पाहीचे.** विदर्भ / मराठवाडा विभागात नियुक्ती देण्याबाबत कोणत्याक्रमाने  दयावी याबाबत स्वंतत्र व विचारपूर्वक नियमावली करण्यात यावी **व त्यांने एकदा कालावधी पूर्ण केला तर त्यास जोपर्यत सर्वाची सेवा तेथे होत नाही तोपर्यत त्या अधिका-यांस पून्हा बळजबरीने तेथे बदली करता येणार नाही. परंतु असे की एखादया उपजिल्हाधिका-यांचा नंबरच विदर्भ / मराठवाडा येथे सेवेसाठी लागला नाही तर मग त्याने पूढील पदोन्नतीवेळी (उदा.  वरिष्ठ उपजिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, ˆद्व ़जिल्हाधिकारी ) या पदावर पदोन्नती देतानाच त्याची नेमणूक त्या विभागात करण्यात यावी. विदर्भात जायचे का मराठवाडा याबाबत जेष्ठता यादीतील क्रमांक, पसंतीक्रम,** उपलब्ध पद संख्या व इतर अनुषंगीक बार्बीचा विचार करून नियमावली तयार करुन त्याप्रमाणे पदस्थापनेबाबत निर्णय घ्यावा.

5. **मंत्रालयातील मंत्री आस्थापनेवर नेमणूक करताना कोणत्रा़ळ (नायब तहसिलदार / तहसिलदार / उपजिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी )यांना उपरोक्त नियुक्तीतून वगळण्यात** यावे. **परंतु सदर** अधिका-याने परिक्षाविधीन कालावधी संपल्यावर **कमीत कमी 3 वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतरच (परिविक्षाधिन कालावधी धरुन ) तो मंत्री आस्थापनेवर** किंवा मंत्रालयीन आस्थापनेवर जाणेस पात्र असेल. **सदर अधिकारी जास्तीत जास्त 5 वर्षे मंत्री आस्थापनेवर राहील नंतर तो पून्हा महसूल संवर्गात  आल्यावर तो सर्व नियमास पात्र राहील. त्यानंतर तो पून्हा मंत्री /** मंत्रालयीन **आस्थापनेवर जाण्यासाठी त्याला किमान 3 वर्षे द्वर्हों. विभागात सेवा केल्यानंतरच  पात्र ठरेल.**

**6.वरिष्ठ नायब तहसिलदार, वरिष्ठ तहसिलदार , वरिष्ठ उपजिल्हाधिकारी , तसेच** अपर जिल्हाधिकारी व सह **जिल्हाधिकारी**

**हेच फक्त प्रतिनियुक्तीवरील पदास पात्र राहील, मात्र मंत्रालयातील मंत्री आस्थापनेवर मात्र** ५ वर्ष सेवा झालेला **कोणीही** अधिकारी केव्हाही **जाण्यास पात्र असेल व ती पदे शासनाची गरज असलेली** तसेच, संवर्गात वाढ झालेली **पदे म्हणून धरण्यात येतील.**

**7.**मुबई मुद्रांक जिल्हाधिकारी येथील ६ पदे तसेच इतर ठिकाणची MIDC,CIDCO, MHADA, MADC,MMRDA,etc.सर्व पदे हि विचारात घेऊन त्यांचा सामावेश त्या त्या विभागात संपर्क करुन त्यांना विश्वासात घेऊन उपजिल्हाधिकारी संवर्गात करण्यात यावा व तसे RR बनविण्यात यावेत.

**8. उपजिल्हाधिकारी** संवर्गात **उपजिल्हाधिकारी** व वरिष्ठ **उपजिल्हाधिकारा** या पदांचा प्रतिनियुक्ति वरील पदांसह ताळमेळ घेऊन ठरावीक पदे वरिष्ठ **उपजिल्हाधिकारा** करीता चिन्हांकित करण्यात यावी. **चिन्हांकित पदाबाबत सर्वांनी बसून वैयक्तिक स्वार्थ विचारात न घेता दुरगामी** व **संरचनात्मक** व **संवर्गाचे भले होण्यासाठी प्रयत्न व विचार** व नियम **करणे आवश्यक राहील.**

**9.**सरळसेवा उपजिल्हाधिकारी व बढतीतून होणारे उपजिल्हाधिकारी यांचा कोटा निश्चित करावा.

**10.**प्रतिनियुक्तीवरील बहुतांश उपजिल्हाधिकारी पदे हि वरीष्ठ उपजिल्हाधिकारी दर्जाची म्हणून चिन्हाकिंत करण्यात यावीत.

११..अ +वर्ग, अ वर्ग,ब वर्ग महानगरपालिकेत वरिष्ठ उपजिल्हाधिकारी पदांना योग्य त्या ठिकाणी (उदा.उपआयुक्त,अपर आयुक्त,आयुक्त इत्यादी ) प्रतिनियुक्तीवरील पदे चिन्हाकिंत / आरक्षित करुन त्याप्रमाणे RR होईल याची काळजी घ्यावी.

१२.निवासी उपजिल्हाधिकारी हे पद फक्त आणि फक्त वरिष्ठ उपजिल्हाधिकारी पदातूनच भरण्यात यावे.

१३. शासकीय शिष्टाचारासाठी प्रत्येक जिल्हयात एक उपजिल्हाधिकारी {जिल्हा शिष्टाचार अधिकारी (DPO-District protocol officer}व त्याच्या अधिनस्त स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी.

## अप्पर जिल्हाधिकारी व सह जिल्हाधिकारी

**1** महाराष्ट्रातील ज्या ठिकाणी १० पेक्षा जास्त तालुके आहेत, अशा ठिकाणचे **निवासी उपजिल्हाधिकारी हे पद अप्पर जिल्हाधिकारी**

**दर्जाचे** करुन ते त्याचे पदनाम अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी (ADM )असे ठेवावे.

**2 महाराष्ट्रात ज्या जिल्हयात 12 किंवा त्यापेक्षा जास्त तालुके आहेत तेथे** पोलिस विभागांप्रमाणे **दोन अप्पर जिल्हाधिकारी पदे ठेवण्यात यावीत.**

**3 विभागीय स्तरावरील भूमी संपादन व मागास वर्ग कक्ष हया शाखा एकत्र करुन त्या ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी दयावा.** त्यातील दोन उपजिल्हाधिकारी पदापैकी **एक उपजिल्हाधिकारी** तेथेच **ठेवून एक उपजिल्हाधिकारी पद विभागीय आस्थापना स्तरावर DCR** यांना आस्थापना / जमीन विषयक कामकाजासाठी मदतीस ( eg. DDCL. Divsional Dy. Collector Land, Konkan division) **देण्यात यावे.**

**4 तसेच अ + महानगरपालीकेत** सहआयुक्त व **उपआयुक्त** म्हणून, **अ व ब महानगरपालीकेत अप्पर आयुक्त** म्हणून, **क नगरपालीकेत आयुक्त** म्हणून, अशी सर्व **पदे ही /अप्पर जिल्हाधिकारी पदातून भरण्यात यावी.**

**5. उपजिल्हाधिकारीयांचे अपील ज्या ज्या ठिकाणी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिका-यांकडेच होतात उदा. ठाणे ती सर्व पदे अप्पर जिल्हाधिकारी दर्जाची करावी.**

**6.DIG Stamp ही सर्व पदे अप्पर जिल्हाधिकारी दर्जाचीच ठेवावी.** तसे RR सुधारण्यात यावेत.

**7.मंत्रालयात कमीत कमी 25 उपसचिव पदे ही अप्पर जिल्हाधिकारी दर्जाची असावीत.**?? **?( 1 osd of ACS revenue, 2 dy secy in CM office, 1 jt collector esta, 3 addl collector esta, 1 dy secy nregs, 1 dy secy resettlement, 1 dy secy in stamp and registration, 1 dy. Secy land acquasition, 1 dy secy in UDD, 1** Dy. Secy. Entertainment **……………………????????)……**

**** It needs studious facts and fugure so that on merits it can be represented.**

**8.सिडको -म्हाडा MMRDA,MIDC,MSSIDC,NIT ACB,CIDCO,MSSIDC,MADC, Film City**

**etc. महामंडळावरील पदे ही** उपजिल्हाधिकारी व **अप्पर जिल्हाधिकारी पदांतून भरण्यात यावी.** त्यांची मागणी असल्याने तसे RR अतीतात्काळ/प्राध्यान्याने, महिन्यात अंतीम करावे.

**9.IAS पदावर / दर्जावर नेमणूका** हे **काम** सह **जिल्हाधिकारी दर्जाचे असावे.** सह जिल्हाधिकारी उपलब्ध नसल्यास अपर जिल्हाधिकारी संवर्गातून सदर नेमणूका कराव्यात.

**10.विभागीय आयुक्त मुख्यालय असलेल्या जिल्हयातील यापूर्वी IAS दर्जाचे असलेले अप्पर जिल्हाधिकारी पद रद्द करुन ती** सर्व पदे सह **जिल्हाधिकारी यांना देण्यात यावीत.**

**11.महाराष्ट्रातील एकूण जिल्हापरिषंदामधील 50 % ठिकाणी CEO हे** सह **जिल्हाधिकारी/** भा.प्र.से. दर्जा जिल्हाधिकारी **पदावरुन भरण्यात यावे??????????...(Needs competent & meritorious reasoning)**

**12.** महाराष्ट्रामध्ये मंजूर असलेल्या IAS पदांचे संवर्ग निश्चिती अतितात्काळ करण्यात यावी.

13.महाराष्ट्रातील IAS पदे पदोन्नतीतून भरण्यासाठी वर्षातून दोनवेळा प्रस्ताव केंद्रशासनाकडे / UPSC कडे पाठविण्यात यावे.

14. महाराष्ट्रामध्ये IAS पदावर फक्त सहजिल्हाधिकारी दर्जाचेच व सर्वात मोठा IAS उद्गमस्त्रोत असलेल्या महसूल विभागाचेच अधिकारी नेमावेत. महाराष्ट्र नागरि सेवा (MCS) व्यतिरिक्त IAS पदावर नेमलेले इतर सर्व अधिकारी तात्काळ काढून घेण्यात यावेत.

## **त्रुटी**

***अप्पर जिल्हाधिकारी पदावर जाण्यास अप्पर जिल्हाधिक-यांनी टाळाटाळ केल्यामुळे त्या पदांवर इतर अधिका-यांची वर्णी लागते** त्यासाठी नियमावली करावी. अशा प्रकारची वस्तुस्थिती आजही असून, काही वरिष्ठ अधिकारी हे जाती जमाती पडताळणी वर काम करण्यास ईच्छूक नाहीत त्यामुळे ते गोपनीय अहवाल/जात वैधता प्रमाणपत्र/विभागीय चौकशीची माहिती इत्यादी देण्यास विलंब करत आहेत त्यामुळे खालील पदापासून वरच्या पदांपर्यंत होणारे पद्दोन्नतीचे चक्र विलंबित होत आहे.

***शक्तीमान महसूल अधिका-यांचे इतर महसूल संवर्ग विरोधी अधिका-यांशी असलेले वैयक्तिक संबधामुळे ? त्यांना का दु:खवायचे हा वैयक्तिक स्वकेंद्रीत विचारामुळे सर्वांगीण**

## महसूल प्रवर्गाचे होत असलेले नूकसान रोखावे.

*संघटना संघटना म्हणावयाचे पंरतू, संघटनेसाठी स्वयंस्फुर्तपणे नोंदणी फी व आर्थिक हातभार लावण्यास असलेली उदासिनता . त्यामुळे सर्वप्रथम जिल्हा / विभाग / राज्य हया संघटना तात्काळ नोंदणीकृत करण्यात याव्यात.

*पदाचा गैरवापर करुन बेकायदेशीर अर्थार्जनामूळे लाचलुचपत विभागाकडून होत असलेल्या कारवाया व त्यामुळे समाजात महसूल संवर्गाबाबतची खालावलेली व ढासळती प्रतिमा सुधारण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

*काही उध्दट, व मनमानी अधिका-यांचे वर्तनामुळे महसूल संवर्गाप्रती समाजाचे बनत असलेले वाईट मत.

*मंत्रालय किंवा वरिष्ठ पातळीवरील पदस्थापना असताना क्षेत्रिय स्तरावरील महसूल अधिकारी कामानिमित्त/भेटीस आले असता सदर मंत्रालयीन/ वरिष्ठ स्तरावरील महसूल अधिका-यांचे क्षेत्रिय स्तरावर काम करणा-या अधिका-यांशी असलेले अंहमपणाचे,उध्दटपनाचे, सावत्रपणाचे व परावलोकीचे वर्तन.

*महसूल बदल्याचा मांडलेला बाजार व ठराविक ठिकाणी बदली व्हावी म्हणून संवर्गातील अधिका-यांना झडलेला नेत्यांच्या हूजरेगिरीचा आजार........

*महसूल अधिका-यांची संकुचित मनोवृत्ती .(स्वत:ची हूशारी, प्रतिष्ठा व वजन हे फक्त स्वार्थीपणाने स्वत:ची कामे/ बदली या कुपमंडूक व आत्मकेद्रींत वृत्तीने /हेतूने उपयोगात आणून सर्वागिंन महसूल संवर्गाप्रती निस्वार्थी योगदान देण्याबाबतची उदासिनता.

*महसूल अधिकारी संवर्गाबाबत व स्वत:च्या विभागाच्या ताकदी बाबत खुप गप्पा मारतो जसे कि .................. असे करायला पाहिजे / तसे करायला पाहिजे / एखदा नमूना दाखवायला पाहिजे / आपण संघठीत व्हायला पाहिजे / संप करून प्रशासन बंद पाडू / शासन काही पण करते ............. इत्यादी ईत्यादी, पंरतू, स्वत:हून पुढाकार घेऊन महसुल संवर्गाच्या भल्यासाठी कोणतीही गोष्ठ करायला तो तयारी दाखवित नाही. थोडक्यात बोलयायचे झाले तर **“चर्चा करेगा खर्चा नही........ बोलबच्चन”** पण कृपया लक्षात ठेवा क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे.

* महसूल संवर्गातील अधिकारी काम करताना राजकीय नेत्यांचे व वरष्ठिंचे शब्द झेलायला किंवा बंदोबस्त करायला केव्हाही तत्पर असतात.पंरतू, महसुल बंधुत्त्व/संवर्गाच्या भल्याबाबत काहीही काम निघाल्यास मात्र ते थोडाही निधी /वेळ देण्याबाबत .......................................???.

## निवेदन

शासनाने आजपर्यंत महसूल प्रशासनावर जो विश्वास ठेवला होता, तो महसूल संवर्गाने यशस्वी करुन दाखवलेला आहे. “जेथे कमी तेथे आम्ही” याप्रमाणे यापूढेही शासनाने कोणतीही योजना /प्रकल्प /कायदा/ सेवा / धोरण इत्यादी

राबविण्याबाबत सर्वप्रथम महसूल विभागासच देण्यात यावे,आम्ही ते १००% यशस्वी करण्याचा पूर्णपणे सकारात्मक प्रयत्न करु. असे नम्र निवेदन शासनाला महसूल संवर्गामार्फत देण्यात यावे.पंरतू, सदर योजना राबविण्यासाठी आम्हांला आवश्यक ते पाठबळ ( Human resource, machinery, official expenditure provision etc) कृपया दयावे, हि आग्रहपूर्वक विनंतीही शासनाला करण्यात यावी.

सबब, महसुल संवर्ग सुधारणा बाबत नियुक्त समित्यांनी कृपया उपरोक्त नमूद बाबींचा आवश्यक्ते नूसार मांडलेल्या मता नूसार/आवश्यक ते फेरबदल करून आपल्या प्रस्तावात समाविष्ठ करावा, हि विनंती.

आपला विश्वासू,

**श्रीधर बा. डुबे-पाटील**

**Collector Of Stamps Mumbai( Enforcent II)**

महाराष्ट्र नागरी सेवा